# प्राचीन मराठीचा समृद्ध ठेवा - मोडी लिपी

# (Preserved richness of ancient Marathi – Modi script)

डॉ. वीरा मांडवकर

सहायक प्राध्यापक

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445 401

इ मेल veeranmandavkar18@gmail.com मो. 9403014885

**गोषवारा –**

मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. त्याच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक सिद्धांत आहेत. मराठ्यांच्या काळात महाराष्ट्रातील बहुतांश व्यवहारात मोडी लिपी वापरली जात असे. दुसरीकडे, मोडी, 1400 च्या दशकात देवनागरीचा लघुलेखन प्रकार म्हणून शास्त्रकारांनी वापरला होता. पूर्वी मोडी लिपीतच सर्व खाजगी व कार्यालयीन व्यवहार महाराष्ट्रात होत असले तरी या लिपीचा उगम नक्की सांगता येणार नाही. एका विचार प्रवाहानुसार महादेव यादव व रामदेव यादव यांच्या काळात (१२६०-१३०९) हेमाडपंतांनी (किंवा हेमाद्री पंडित) ही लिपी विकसीत केली तर काहीच्या मते हेमाडपंतानी ही लिपी श्रीलंकेहून आणली.

## Abstract -

Modi script is the script used to write the Marathi language, which is the primary language spoken in the state of Maharashtra. There are many theories regarding its origin. During the Maratha period, Modi script was used in most transactions in Maharashtra. Modi, on the other hand, was used by scribes as a shorthand form of Devanagari in the 14th century. Modi script was regularly used by all private and Government offices in Maharashtra. The origin of this script cannot be said with certainty. According to one thought, Hemadpant (or Hemadri Pandit) developed the script during the reign of Mahadev Yadav and Ramdev Yadav (1260-1309), while others believe Hemadpant brought this script from Sri Lanka.

**बीजशब्द –** मोडी लिपी, देवनागरी, उत्पत्ती, दस्तऐवज, सिद्धांत, उगम, भाषा

**प्रस्तावना -**

मोडी ही १३व्या शतकापासून २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव आणि रामदेव यादव यांच्या राज्यकालात १२६०-१३०९ हेमाडपंत (खरे नाव हेमाद्री पंडित) या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. छपाईस अवघड असल्यामुळे मोडी लिपीचा वापर मागे पडला आणि बाळबोध (देवनागरी) लिपीचा वापर सार्वत्रिक सुरू झाला. हा वापर सक्तीने करण्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली. मोडी लिपी पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्तऐवज पाहिले असता त्या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर

शुद्धलेखन हे या लेखनाचे वैशिष्ट्य. शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई ह्या काळांतील मोडीवाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो.

मोडी लिपीची बाराखडी




## मोडी लिपीची उत्पत्ती -

मोडी हे नाव मराठी क्रियापद मोडणे, तोडणे यावरून आले आहे. मोडीचा शाब्दिक अर्थ आहे 'तुटलेली'. मोडी लिपीच्या उगमाबद्दल अनेक मते व मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे व डॉ. भांडारकरांच्या मते हेमाडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली, परंतु चांदोरकरांच्या मते मोडी लिपी अशोककालातील मौर्यी (ब्राह्मी)चाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर आणि वालावलकरांच्या मते मोडी लिपी ही ब्राह्मी लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या तिच्या वैशिष्ट्यामुळे इतर लिपींपेक्षा वेगळी झाली आहे. मोडी लिपी श्रीलंकेतून आणली गेली असावी अथवा मौर्यी लिपीवरून विकसित झाली असावी हे म्हणणे वाकणकर आणि वालावलकर यांना मान्य नाही. मोडी लिपी महाराष्ट्रात कमीत कमी ९०० वर्षे वापरात आहे. सर्वांत जुना उपलब्ध मोडी लेख इ.स. ११८९ मधील आहे. ते पत्र पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात आहे. मोडी लिपी अल्पप्रमाणात का होईना, १९५० पर्यंत लिखाणात

प्रचलित होती. शेवटच्या २-३ शतकात मोडी लिपीत अनेक फेरबदल झालेले आहेत. साधारण इ.स. १७०० च्या सुमारास चिटणिसी आणि वळणे ही पूर्णपणे प्रगत झाली व यानंतर त्यात फारसे बदल दिसून येत नाहीत. ऐतिहासिक कागदपत्रांतील मोडी लिपी क्लिष्ट आणि वाचण्यास कठीण असते.

मोडी लिपी पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्तऐवज पाहिले असता त्या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर शुद्धलेखन हे या लेखनाचे वैशिष्ट्य. शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई ह्या काळांतील मोडीवाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो. इ.स. १८०१मध्ये विल्यम कॅरे या मिशनऱ्याने पंडित वैजनाथ यांच्या मदतीने पहिला मोडी लिथोग्राफ, श्रीरामपूर बंगालयेथे बनवला. "रघु भोसल्यांची वंशावळी ", " मराठी भाषा व्याकरण", "मराठी कोष", "नवा करार "(१८०७) या ग्रंथांची मोडी लिपीत छपाई केली गेली.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताप्रमाणे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या काळात मोडी संकल्पना महाराष्ट्रात येत होती. याच काळात पहिले मुस्लिम आक्रमण भारतात होत होते. लिखाणाकरिता कागदाचा वापर हा मुस्लिमांनी भारतात सुरू केला असावा, कारण कागज हा फ़ार्सी शब्द असून कागज या अर्थाचा संस्कृत शब्द अस्तित्वात नाही. इतिहासाचार्य राजवाडे ज्ञानेश्वरीतील खाली नमूद केलेल्या ओव्यांचा आधार देतात. देवनागरी अक्षरे आडव्या, उभ्या आणि टोकदार रेषांचा अवलंब करते, त्यामुळे लिखाणाच्या हस्तलिखित प्रती बनवताना वेग कमी होतो. तर शिकस्त प्रमाणे गोलाकार व एकमेकांना जोडली जाणारी वळणे वापरून वापरली जाणारी मोडी हस्तलिखिताचा वेळ वाचवत होती. विराम चिन्हांचा वापर इंग्रजी भाषाशी ओळख झाल्यानंतरच भारतीय लिपींत सुरू झाला.

काही विद्वांनाच्या मते मोडी हा शब्द मौरयी या वरून आला असावा. यावरुन असे निदर्शनास येते की मोडीचा उगम किंवा हे रूप मौरयी लिपीवरून प्राप्त झाले असावे. मौरयी लिपी ही मौर्य वंशाच्या काळात वापरली जात असे. भारतावर मौर्य वंशाचे राज्य हे इ.स. पूर्वी ३२२ ते १८५ या दरम्यान होते. मोडी लिपी ही लिहीण्यास जलद असल्याने देवनागरीपेक्षा तिला अधिक महत्त्व प्राप्त झाले. लेखणी न उचलता ही लिपी लिहिता येते, कारण देवनागरीसारखे मोडीत शब्द तोडावे लागत नाहीत.

मराठा साम्राज्याच्या स्थापनेने, अर्थातच, या परंपरेला नवीन उंचीवर नेले, कारण पूर्वीच्या सल्तनतींच्या विरूद्ध, मराठ्यांनी मराठी ही शक्ती आणि संस्कृतीची भाषा म्हणून सक्रियपणे जोपासली. मोडीच्या वापराला साम्राज्यातील शासक आणि श्रेष्ठांकडून मोठ्या प्रमाणात चालना मिळाली, ज्यांनी वैयक्तिक पत्रव्यवहार आणि प्रशासनात लिपी वापरली. आश्चर्याची गोष्ट नाही की, मोडी या काळाची सर्वात मजबूत साक्षिदार आहे.

## मोडी लिपीचे चार कालखंड -

मोडी लिपीचे चार कालखंडांत वर्गीकरण केले गेले आहे - यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन आणि आंग्लकालीन. यादवकालीन मोडी लिपी लिखाणात अक्षरे एकमेकांच्या अगदीच जवळ आणि उभी काढली गेली. तीच, शिवकालीन शैलीय किंचित उजवीकडे झुकलेली दिसतात. मोडी लिपीला तिरकस वळण, अधिक वर्तुळाकार आणि सुटसुटीत अक्षरे लिहिण्याचा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी सुरू केला. तोपर्यंत मोडी लिपी ही टाकाने लिहिली जात असे. असाच प्रयत्न पुढे चालू ठेवून पेशवेकालीन शैलीत मोडी अगदीच रेखीव, गोलाकार, तिरकस आणि सुटसुटीत लिहिली जाऊ लागली. पेशवेकाळातील लिखाण बोरूने होत असे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज राजवटीत फाऊंटन पेनचा वापर सुरू झाला. बोरूने जी प्रत्येक अक्षराला जाडी-रुंदी आणि टोक येत असे ते या फाऊंटन पेनच्या वापरात शक्य नसल्याने मोडी लिपी अगदीच गुंतागुंतीची आणि किचकट दिसू लागली. फाऊंटन पेनचा एकच फायदा होता तो म्हणजे

त्यात शाई बराच वेळ टिकून राही. म्हणून सध्याचे मोडी लेखक फाऊंटन पेनच्या कॅलिग्राफीच्या निब्सचा वापर करतात आणि लिखाणात काही प्रमाणात पेशवेकालीन मोडी लिपीचे सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करतात.

अलीकडे, कर्नाटकात ९व्या शतकातील काही आढलेले शिलालेख हे मोडी लिपीत असून त्यांत असलेली लिपी, ही मोडी लिपी शिकस्तामधून निर्माण झाली या मताचे खंडण करतात. १०व्या शतकात “नस्तलीक” मधून “शिकस्ते” लिपी जन्मास आली. “शिकस्ता” म्हणजे “मोडकी नस्तलीक”. यावरून स्पष्ट होते की मोडी लिपीची संकल्पना ही शिकस्तामधून आली नव्हती. कारण, महादेवराव, रामदेवराव किंवा हरपालदेवराव यादवांच्या कारकिर्दीत मराठी लोकांचा श्रीलंकेशी संपर्क आला नव्हता. मात्र मोडी लिपीचे नागरी, गुर्जरी (म्हणजे महाजनी) आणि बंगाली लिप्यांशी साधर्म्य आहे.

## मोडी लीपीच्या पुनरुज्जीवनाची गरज -

मोडी लिपीतील उपलब्ध साहित्याचा अभ्यास करण्याची प्रक्रिया चालू असली तरी इतिहासाची मोडी लिपीत जवळ जवळ १५ लाख पाने अशी आहेत की जी अजुन वाचल्या गेली नाहीत आणि त्यात दडलेला इतिहासही आपणास माहीत नाही. दुसरी बाब म्हणजे मोडी लिपीचे जाणकार अख्ख्या महाराष्ट्रात केवळ १०० आहेत, हेही कारण या अप्रकाशित इतिहासामागे असावे. पूर्वी मोडी लिपीतच सर्व खाजगी व कार्यालयीन व्यवहार महाराष्ट्रात होत होते. चार्लस विल्कीन याने ह्या लिपीचे टाईप तयार केले, जेणे करून काही मर्यादित स्वरूपात छपाईसाठी त्याचा उपयोग झाला. ही लिपी १९५० पर्यंत वापरात होती त्यांनंतर मात्र तिचा वापर अधिकृतपणे बंद केला गेला कारण छापण्यासाठी ती अवघड होती आणि तेव्हापासून मराठी देवनागरीत लिहिल्या जाऊ लागली.

मोडी लिपी ही देवनागरीची जलद लिपी आहे. अगदी स्वातंत्र्य काळापर्यंतचा सर्व व्यवहार व कागदपत्रे मोडीतून असल्यामुळे मोडीत बराच इतिहास दडलेला आहे. आज भारतात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, गुजरात, चेन्नई, तामिळनाडू तसेच केरळ आदी मराठ्यांचे राज्य असलेल्या ठिकाणी मोडी लिपीतील कोट्यवधी कागदपत्रे वेगवेगळ्या सरकारी, खाजगी तसेच संस्थाच्या दफ्तरात धूळ खात पडून आहेत. अनेक घराण्यात वंशपरंपरागत ताम्रपट, कागदपत्रे वाचकांची वाट पाहत पडून आहेत. हे साहित्य लिहू व वाचू शिकणाऱ्या लोकांचा संगम करून हा उज्ज्वल इतिहास सामान्य जनांना उपलब्ध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे व मोडीलिपीचे पुनरुज्जीवन व प्रसार करणे ही काळाची गरज आहे.

मोडी लिपीतील असंख्य दस्तऐवज हे खाली दिलेल्या ठिकाणी संग्रहित केले आहेत.

सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर, तामिळनाडू

कॉनेमारा ग्रंथालय, मद्रास युनिव्हर्सिटी, चेन्नई, तामिळनाडू

भारत इतिहास संशोधक मंडळ ,पुणे

राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

मराठी इतिहास संशोधन मंडळ

तसेच लंडन, पॅरिस, नेदरलँड्स, स्पेन येथील संग्रहालयातही आहेत.

## निष्कर्ष -

1. मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे.
2. मराठ्यांच्या काळात महाराष्ट्रातील बहुतांश व्यवहारात मोडी लिपी वापरली जात असे.
3. महादेव यादव आणि रामदेव यादव यांच्या राज्यकालात १२६०-१३०९ हेमाडपंत (खरे नांव हेमाद्री पंडित) या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला.
4. मोडी लिपी पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती.
5. लेखणी न उचलता हि लिपी लिहिता येते, कारण देवनागरी सारखे मोडीत शब्द तोडावे लागत नाहीत.

6. इतिहासाची मोडी लिपीत जवळ जवळ १५ लाख पाने अशी आहेत की जी अजुन वाचल्या गेली नाहीत.

7. मोडी लिपीचे पुनरुज्जीवन व प्रसार करणे ही काळाची गरज आहे.

## संदर्भ


1. https://mr.wikipedia.org/s/hga
2. https://www.facebook.com/groups/MoDi.Lipi/
3. कुलकर्णी म.रा., तुम्हीच मोडी शिका, विकास बुक हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, 2011
4. टिळक श्रीकृष्ण लक्ष्मण, सहज सोपी मोडी लिपी, व्यास क्रिएशन्स, ठाणे, प्रथमावृत्ती, 2019
5. माळी नवीनकुमार, मोडी लिपी शिका सरावातून, अध्ययन पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, 2016.


Available at SSRN: https://ssrn.com/abstract=4590030